# महात्मा गांधीजीचे आर्थिक विचार व आजची परिस्थिती

**डॉ.गंगाधर रामराव भुक्तर,** सहा.प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख, विश्वासराव नाईक कला वाणिज्य आणि बाबा नाईक विज्ञान महाविद्यालय, शिराळा ता.शिराळा, जि.सांगली

---

**प्रास्तवना :-**

महात्मा गांधी यांचे पूर्ण नाव मोहनदास करमचंद गांधी यांचा जन्म 2 ऑक्टोंबर 1869 रोजी पोरबंदर येथे झाला. गांधीचे बालपण पोरबंदरात गेले. त्यांचे विद्यापीठ जीवन फारसे उज्वल म्हणता येणार नाही. पुढे त्यांच्या बंधुंनी त्यांना शिक्षणासाठी परदेशी पाठविले तूया ठिकाणी त्यांची मैत्री दोन तत्वेत्या मित्राशी पडली त्यांचा सहवास गांधीजीच्या जीवनाला नवी दिशा दाखविण्यास कारणीभूत ठरला त्या मित्राच्या पेरणेने गांधीजींनी गीताध्ययनास प्रवृत्त झाले ते असे म्हणत. तत्वज्ञानाच्या बाबतीत मी ‘‘भगवद्गीता’’ हा सर्वोत्तम ग्रंथ समजतो त्यांनी परदेशातच कायद्याची पदवी प्राप्त केली.

परदेशातील टॉलस्टॅाय, रस्किन आणि थोरो यांच्या विचारवैभवानी गांधीच्या जीवनाला महत्वाचे वळण दिले त्यांच्या जीवनावर कार्यावर आणि तत्वज्ञानावर या तिघांच्या विचारांचा खोल ठसा उमटला व तोच ठसा गांधीजीच्या जीवनात जन्मभर टिकून राहिला. ‘‘अन टू धिस लास्ट’’ मधील विचार अमलात आणण्यासाठी गांधीजीनी त्या पुस्तकाचे गुजराती भाषांतर ‘‘सर्वोदय’’ या नावाने केले तर ‘‘किंडम ऑफ गॉड’’ या ग्रंथामधील ‘ईश्वराचे साम्राज्य तुमच्यात आहे’ या संदेशामुळे गांधीजी भरावून गेले आणि ते अहिंसेचे पुजारी झाले.

**गांधींचे आर्थिक विचार :-**

गांधींचे आर्थिक विचार हे त्यांच्या नैतिक व आध्यात्मिक सिध्दांतावर आधारलेले आहेत. गांधीजीचे आर्थिक विचार हे तीन अवस्थेत विभागलेले दिसून येतात पहिली अवस्था 1919 पर्यंत दुसरी 1919 ते 1934 आणि तिसरी अवस्था ही 1934 ते 1948 पर्यंतची 1909 मध्ये गांधीजीनी लिहिलेल्या ‘हिंद स्वराज्य’ या पुस्तकामध्ये यंत्राच्या वापरावर व आधुनिक उत्पादन पध्दतीवर टीका केली. एकूण आर्थिक विचारामध्ये हे गांधीजीचे नकारार्थी विचार होते. दुसऱ्या अवस्थेत स्वदेशी चळवळीवर आधारीत विचार विकसीत केले तर तिसऱ्या अवस्थेत व्यवहारवादी अशी ‘‘सर्वोदय’’ ची संकल्पना मांडली यामध्ये त्यांनी ग्रामीण उदयोगाची पुनर्चना आणि उत्पादक व्यवस्थापणाचे विकेंद्रीकरण यावर आधिक भर दिला. सर्वाच्या कल्याणात आपले कल्याण आहे. अंगमेहनत करणे, शेतकऱ्याचे जीवन हेच खरे जीवन होय, हे सर्वोदयाचे सिध्दांत होत. त्यांचे इतर आर्थिक विचार खालील प्रमाणे आहेत.

**साधेपणा :-**

गांधीजी यांच्या मते, समाजातील प्रत्येक व्यक्तीने साधे जीवन जगण्याच प्रयत्न केला तर सर्व प्रश्न आपोआप सुटतील, साधी राहणी व उच्च विचारसरणीचा पुरस्कार गांधीनी केला. गांधीजीच्या मते प्रत्येक व्यक्तीचे मन हे अस्वस्थ पक्ष्यासारखे असते. जास्त मिळवत जात असताना माणसाच्या गरजा वाढत जातात व व्यक्ती असमाधानी राहते. प्रत्येक भारतीय मानसाने देशाची परिस्थिती लक्षात घेऊन आपल्या गरजा कमी करायला शिकल्या पाहिजे, थोडक्यात जीवन जगतांनी सचोटी, प्रामाणिकपणा व संयम दाखवून आचार व प्रचार हे सुसंगतीपणे केले पाहिजे, म्हणजे स्वातंत्र्य, समानता, विकास व मानवी जीवनाच्या सुखासाठी नैतिक व साध्या जीवनशैलीचा गांधीजीनी पुरस्कार केला.

**ग्रामोद्योग, उद्योगाचे यांत्रिकीकरण आणि विकेंद्रीकरण संबधी विचार :-**

मोठ्या उद्योगाने गांधीजीचा तात्विक विरोध असला तरी त्यांनी काही मोठया उद्योगांना मान्यता दिली होती परंतु मोठया उद्योगाच्या निर्मितीमुळे लहान उद्योग नष्ट होणार नाहीत याची काळजी घेतली पाहिजे. त्याच प्रमाणे गांधीजीच्या आर्थिक विचारामध्ये त्यांनी यांत्रिकीकरणाला विरोध न करता त्यांचा स्वीकार केला. विज्ञानाच्या रथाला बाजाराचा घोडा जोडला जाऊ नये व विज्ञानाच्या प्रगतीची परिणती मानवी बंधुत्वाच्या स्थापनेत व्हावी ही त्यांची आशा होती. म्हणूनच अर्थविज्ञान हे स्वार्थ विज्ञान होऊ नये, अर्थकारण अनर्थाचे मुळ ठरू नये, असा इशारा

गांधीजीनी दिला होता. माणसाला उपकरणाचे स्वरूप येवू नये व तो साधन न बनता साध्य राहावा म्हणून उपकरणे माणसाच्या विकासाकरिता त्याच्या इंद्रियाच्या कौशल्यात भर टाकणारी असावीत.

मोठ्या उद्योगात यंत्राचा वापर फार मोठ्या प्रमाणात होतो, त्यामुळे आर्थिक, सामाजिक, राजकीय, प्रश्न निर्माण होतात, त्यामुळे गांधीजीनी मोठ्या उद्योगाना विरोध केला होता. परंतू त्यांचा सर्व यंत्राना विरोध नव्हता तर मानवी श्रमावर प्रतिकूल परिणाम करणाऱ्या बेरोजगार वाढीस कारणीभूत ठरणाऱ्या केंद्रीकरणाला चालना देणाऱ्या मोठ्या उद्योगाबाबत व त्यामध्ये वापरल्या जाणाऱ्या यंत्रास गांधीजीचा विरोध होता.

गांधीजीच्या मते ग्रामोद्योगांना संरक्षण दिले पाहिजे. भारत देशात भांडवलाची कमी असल्यामुळे कमी भांडवल लागणारे लहान उद्योगधंदे मोठ्या प्रमाणात बेकारीचा प्रश्न दूर करू शकतील खेडे हा भारताचा विकासाचा केंद्र बिंदू आहे. विकासाची खरी सुरूवात ही खेड्यापासून करायला हवी आणि जनतेत स्वराज्य शक्ती निर्माण करण्याचे ते एक साधन आहे. त्यामुळे त्यांनी ग्रामोद्योग निर्माण करण्यावर भर दिला होता. त्यांच्या मते मोठ्या उद्योगाऐवजी उद्योगांचे विकेंद्रीकरण करून छोटे-छोटे उद्योगधंदे काढले पाहिजे खेड्याचे पुनरूज्जीवन करण्यासाठी संपन्न शेती उद्योगांचे विकेंद्रीकरण आणि लहान प्रमाणावरील सहकारी संस्थाची निर्मिती यावर अधिक भर दिला होता. विकेंद्रीकरण म्हणजे वेगवेगळया ठिकाणी लहान प्रमाणावरील उत्पादन व लोकांनी घरामध्ये केलेले उत्पादन होय. उद्योगाच्या विकेंद्रीकरणामुळे समन्यायी वितरण व्यवस्था निर्माण होऊ शकते व संपत्तीच्या केंद्रीकरणाला प्रतिबंध बसू शकतो. त्यामुळे स्वराज्याचे स्वप्न साकार करण्याचे प्रभावी साधन म्हणून विकेंद्रीकरणला महत्व दिले होते.

**लोकसंख्या आणि अन्नधान्य :-**

बंगालमध्ये 1943- 44 मध्ये जो दुष्काळ पडला होता. त्यामुळे संपूर्ण भारतात अन्नधान्याचे टंचाई निर्माण झाली. त्यामुळे अन्नधान्यांच्या किंमतीतील वाढ झाली यावेळी या संकटातून बाहेर पडण्यासाठी गांधीजीनी व्यापारी वर्गांनी साठेबाजी व सट्टेबाजी करू नये असा सला दिला व अन्नधान्याची समस्या सोडविण्यासाठी पुढील उपाय सुचविले.

1. व्यक्तीनी आपल्या शरीराच्या आवश्यकतेनुसार अन्नधान्याची गरज कमी करावी.
2. ज्या ठिकाणी पालेभाज्य, दुध, फळे, तेल मिळेल तेथे अन्नधान्य व डाळीचा उपयोग कमी घ्यावा.
3. खाद्यासाठी फुलबागांचा उपयोग करावा.
4. काळाबाजार पुर्णपणे नष्ट करावा.
5. सरकारमार्फत जलसिंचनासाठी खोल विहिरी खुदाई करावी.
6. तेलबिया व पेंड यांची निर्यात करू नये.

गांधीजीनी 1947 मध्ये अन्नधान्यावरील नियंत्रणे हटविण्यासाठी सरकारला सुचना केल्या. गांधीजींच्या मते वाढती लोकसंख्या नियंत्रीत करण्यासाठी कृत्रिम साधनांचा वापर केला जाऊ नये, जननदर नियंत्रित करण्यासाठी स्वयं नियंत्रन किंवा ब्रम्हचार्य यांचा स्वीकार करावा, कृत्रिम साधने ही अपायकारक व घातक आहेत त्यामुळे स्वयंशिस्त व लैंगिक शिक्षणावर अधिक भर दिला. गांधीजीच्या मते शस्त्र क्रिया हा उपाय अमानवी आहे. स्त्रीयांच्या बाबतीत निर्बीजीकरणाचा गांधीजीनी पुरस्कार केला नव्हता मात्र पुरूषानी स्वइच्छेने निर्बीजीकरण केल्यास त्याला विरोध केलेला नव्हता.

**वर्गसमन्वयाची कल्पना :-**

गांधीजीच्या आर्थिक विचारात वर्गसमन्वयाची कल्पना अत्यंत महत्वपूर्ण आहे. आर्थिक विषमता नष्ट करण्याचे हे एक प्रभावी साधन आहे. आर्थिक विषमता नष्ट करणे म्हणजे मानसा-मानसामधील संपन्न व विपन्न हा भेद नष्ट करणे होय, ख-या अर्थाने कौटुंबिक भावनेचा विस्तार हाच गांधीजीच्या अर्थशास्त्राचा मुलमंत्र आहे. दुर्बलांना संधी देऊन त्यांना सबळ बनविले व त्यांना समान उत्कर्ष साधण्यास पेरणा देवून प्रोत्साहीत करणे ही सामाजिक न्यायावर आधारलेली अर्थनिती आहे. गांधीजीनी भांडवलदार आणि गरीब यांच्यामध्ये समन्वय साधन्यासाठी हृदये परिवर्तनाचा मार्ग सांगितला.

**विश्वस्त कल्पना व बेकारी :-**

विश्वस्ताची कल्पना ही महात्मा गांधीजीच्या आर्थिक विचारांचा महत्वाचा विचार मानला जातो. या कल्पनेमुळे पृथ्वीवर समतेचे राज्य प्रस्तापित होऊ शकेल. सर्व संपत्ती ही ईश्वरी संपत्ती आहे. त्यामुळे संपत्तीवर सर्वाचीच प्रस्तापित झाली पाहिजे श्रीमंत व्यक्तीने त्याच्या जवळील संपत्तीचा उपयोग समाजाचा विश्वस्त या दृष्टीने करावा संपत्ती धारकाने आपल्या गरजा मर्यादीत ठेवल्या पाहिजेत व उरलेल्या संपत्तीचा उपयोग लोक कल्याणसाठी केला पाहिजे. यामुळे श्रीमंती-गरिबीतील अंतर कमी घेऊन समाजात आर्थिक समता निर्माण होईल.

भारतात श्रमपुरवठा अधिक असल्याने त्याचा पर्याप्त वापर करण्याच्या दृष्टीने गांधीजीनी ग्रामउद्योगाचा व लहान उद्योगाचा स्वीकार केला होता. अश्या श्रमप्रधान उद्योगांमुळे बेकारी कमी होऊन श्रमिकांचे जीवन सुसह्य होईल. श्रम कोणत्याही प्रकारचे असो त्याला समाजात प्रतिष्ठा मिळाली पाहिजे यासाठी गांधीजीनी श्रमप्रधान समाजरचनेचा स्वीकार केला. त्यांचे हे विचार आधुनिक काळात देखील अत्यंत उपयुक्त आहे.

**सर्वोदय योजना :-**

गांधीजीनी ‘अन टू धिस लास्ट’ या रस्किनच्या पुस्तकाचे भाषांतर केलेंडर आणि ते ‘‘सर्वोदय’’ या नावाने प्रकाशीत केल्या गेले सर्वोदयचे सिध्दांत गांधीजीना खालीलप्रमाणे समजले होते.

1.जनकल्याण आपले कल्याण आहे.

2.वकील व न्हावी या दोघाच्या कामाची किंमत सारखीच असली पाहिजे कारण दोघांनाही पोटपाण्याचा हक्क सारखाच आहे.

3.साधे, अंगमेहनतीचे शेतकऱ्याचे जीवन हेच खरे जीवन होय.

स्वालंबी अश्या प्रादेशिक उद्योगधंद्याचा विकास करण्याची कल्पना गांधीजीनी सर्वोदय योजनेत मांडली. सर्वांचे कल्याण करण्यासाठी आखलेली योजना म्हणजे सर्वोदय होय. या योजनेत प्रत्येक व्यक्तीला त्याच्या गरजा भागविण्यासाठी समानसंधी मिळाली पाहिजे. ग्रामीण उद्योगधंद्यांना गांधीजीनी अधिक महत्व देऊन सर्वोदयाची योजना मांडली या योजनेत आर्थिक स्वावलंबन, सत्तेचे विकेंद्रीकरण, प्रादेशिक उद्योगधंदे, कुटीर उद्योगाचा विकास, यंत्रचा कमीत कमी वापर, मोठ्या उद्योगाचे राष्ट्रीयीकरण व या सर्वामध्ये लोकांचे सहकार्य व सहभाग अपेक्षीत आहे.

**अहिंसा व मानवी मुल्ये :-**

गांधीजीच्या मते सत्य आणि अहिंसा हया परस्परापासून अविभाज्य आहेत. तरी पण अहिंसा हे साधन तर सत्य हे साध्य आहे. असे त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे अहिंसा हे मानवाचे सर्वश्रेष्ठ कर्तव्य ठरते यालाच ते ‘‘आत्मबल किंवा माणसातील ईश्वरी बल’’ असे संबोधतात तसेच गांधीजींनी पैसा आणि भौतिक संपत्तीपेक्षा नैतिक आणि मानवी मुल्यावर अधिक भर दिला आहे. त्याच्या मते मानवी जीवनाचा सर्वांना अभ्यास केला पाहिजे. अर्थशास्त्र व नीतीशास्त्र यात फरक करता येणार नाही. असे गांधीजीनी स्पष्ट केले माणूस हा सर्वोच्च् विचारवंत असून त्याचे जीवन पैशापेक्षा अधिक महत्वाचे आहे.

**भारतातील आर्थिक स्थिती :-**

भारतीय अर्थव्यवस्था ही जगातील प्रगत अर्थव्यवस्था होत असतानाही आज भारतीय अर्थव्यवस्थेची आर्थिक परिस्थिती ही चिंताजनक असल्याचे दिसून येते कारण भारतीय अर्थव्यवस्था ही जगातील बलाढय अर्थव्यवस्थेच्या रांगेमध्ये आपले स्थान निर्माण करत असताना सुध्दा दारिद्रय, बेकारी, भाववाढ, रूपयाचे मुल्याची घसरण अशा नाना प्रकारच्या समस्याना भारतीय अर्थव्यवस्थेला तोंड देत असताना त्या कमी करण्यासाठी नाकी नऊ देत आहेत. त्या सविस्तरपणे पुढीलप्रमाणे बघता येतात.

**दारिद्रय व बेकारी :-**

जगातील एकूण गरिबांमधील 22 टक्के लोक भारतात आहेत. यावरून भारतातील दारिद्रयाच्या समस्येची भयानकता लक्षात येते. नियोजन मंडळाने मार्च 2012 मध्ये जाहीर केलेल्या प्रेसंनोटनुसार सन 2009-10 मध्ये

दारिद्रेषेखालील लोकसंख्या 29.9 टक्के होती यातील ग्रामीण भागातील 33.8 टक्के तर शहरी भागात 20.9 टक्के इतकी होती.

राष्ट्रीय नमुना पाहणीच्या 66 व्या फेरीनुसार सन 2009-10 मध्ये 9.8 टक्के दशलक्ष लोक बेकार होते. तसेच लेबर ब्युरोकडून करण्यात आलेल्या पाहणीनुसार भारतातील बेकारीचा दर 9.4 टक्के होता. म्हणजेच 40 दक्षलक्ष लोक बेकार होते ही परिस्थिती आर्थिक मंदीमुळे वाढलेली दिसून येते. परंतु ही चिंतेची बाब आहे.

**आर्थिक विषमता व प्रादेशीक असंतुलन :-**

भारतीय रिझर्व बँकच्या पाहणी नुसार भारतातील ग्रामीण कुटूंबापैकी तळातील 51 टक्के कुटूबांकडे एकूण मालमत्तेच्या फक्त 10 टक्के मालमत्ता आहे. तर 10 टक्के ग्रामीण श्रीमंत कुटूंबाकडे 49 टक्के मालमत्ता आहे. शहरी भागात तर यापेक्षा ही भयानक परिस्थिती आहे. 50.7 टक्के कुटूंबाकडे एकूण मालमत्तेच्या 5.3 टक्के मालमत्ता आहे. तर 14.2 टक्के कुटूंबाकडे एकूण मालमत्तेच्या 66 टक्के मालमत्ता आहे. यावरून असे स्पष्ट होते की आजही भारतामध्ये आर्थिक विषमता ही समस्या मोठया प्रमाणात आहे.

प्रादेशिक विकासा बाबतीत सुध्दा प्रामुख्याने दोन गटात राज्याचे विभाजन केले जाते. ते असे की, पुढारलेल्या राज्यात पंजाब, गुजरात, पश्चिम बंगाल, कर्नाटक, केरळ, महाराष्ट्र, हरियाना, तामिळनाड आणि आंध्रप्रदेश तर मागास राज्यात मध्यप्रदेश, ओरिसा, उत्तर प्रदेश, राज्यस्थान, ओरिसा आणि बिहार यांचा समावेश होतो. तर एकूण लोकसंख्या 48 टक्के लोकसंख्या ही प्रगत आहे. तर 42 टक्के लोकसंख्या ही मागास राज्यात आहे. म्हणजेच आजही भारतातील आर्थिक विषमता आणि प्रादेशिक असंतुलनाची समस्या कमी होण्यापेक्षा भयानक होत जात आहे.

**गांधीजींचे विचार व आजची आर्थिक परिस्थिती :-**

गांधीजीनी भारतातील आर्थिक सामाजिक आणि राजकीय चिंतनाला व कार्याला एक नवी दिशा दिली. आजच्या काळात खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाच्या संदर्भात भारतातच नाहीतर जगामध्ये गांधीजीचे तत्वज्ञान अपरिहार्य आहे. गांधीजींच्या आर्थिक विचारांची आजच्या बदलत्या परिस्थितीत निंतात आवश्यकता आहे. आज देशातील बेकारी, दारिद्रय व आर्थिक विषमता वाढत असताना गांधीजीनी सुचविलेली विश्वस्त कल्पना व सर्वोदय कल्पना निश्चितच वरील समस्या कमी करण्यास व मानवी कल्याणात भर घालणारी असून आर्थिक व सामाजिक समता निर्माण करणारी आहे. भारतालाच नाही तर जगाला सुध्दा रक्तपात हिंसा, फसवणूक, भ्रष्टाचार या समस्येतून बाहेर पाडण्यासाठी गांधीवाद अनुसरण्याखेरीज गत्येंतर नाही.

**संदर्भ ग्रंथ :-**

1. भारतीय अर्थव्यवस्था डॉ. देशमुख प्रभाकर .
2. भारतीय अर्थव्यवस्था डॉ. देसाई आणि डॉ. भालेराव .
3. गांधी मो. क. मराठी अनुवाद सीताराम पुरूषत्तम पटवर्धन ''सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा''
4. आर्थिक विचारांचा इतिहास संपादक, प्रा. डॉ. जे. एफ. पाटील, फडके प्रकाशन, कोल्हापूर
5. अर्थशास्त्रीय विचारांचा इतिहास के.बी.काटे, अजब पुस्तकालय, कोल्हापूर.